

एकलव्य



बिरसा मुंडा


तंट्या भिल्ल


राघोजी भांगरे


राणी दुर्गावती


खाज्या नाईक


डॉ. गोविंद गारे

नोंदणी क्र. : संस्था ३७६/८८
ट्रस्ट : एफ-४८६२/८८

आदिवासी समाज कृती समिती
महाराष्ट्र, पुणे

# आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे


५३/१ब, विनायक नगर, पिंपळे गुरव, पुणे - ६१.
फोन : (०२०) २७२८५१६३




# अहवाल

## सन २०१२ ते २०१५

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

# संस्थेचे पदाधिकारी



श्री. सीताराम जोशी
अध्यक्ष



श्री. नामदेव गांभिरे
कार्याध्यक्ष



श्री. एकनाथ बुरसे
उपाध्यक्ष



श्री. खेवजी भोईर
उपाध्यक्ष



श्री. सतीश लेंभे
सचिव



श्री. दुंदा मोरे
सह-सचिव



श्री. लक्ष्मण भालेकर
खजिनदार



श्री. रामचंद्र शेळकंदे
संचालक



श्री. गंगाराम सांगडे
संचालक



श्री. किसन भोजने
संचालक



श्री. सुदाम चपटे
संचालक



श्री. प्रशांत शिंगाडे
संचालक



श्री. गोविंद झांजरे
पदसिद्ध संचालक

# मनोगत

सन १९८८ साली नोंदणीकृत झालेल्या आपल्या संस्थेस आता २७ वर्षे होत आहेत. असंख्य संस्था, समाजातील थोर व्यक्ती व दानशूर सहकारी व मित्रपरिवार ह्यांचे सहकार्याने अनेक उपक्रम मार्गी लागले व म्हणता म्हणता वर्षे उलटून गेली.

आपल्या समोर काही तरी मांडावे ही मनातील तळमळ नेहमीच होती. परंतू एवढ्या वर्षाचा अहवाल मांडणे शक्य होणार नाही म्हणून सन २०१२-२०१५ ह्या तीन वर्षाचा कार्याचा संक्षिप्त अहवाल आपणासमोर मांडत आहोत आणि हे करण्यासाठी आपले सहकार्य होते म्हणूनच हे करु शकलो.

संस्थेने आपले कार्यक्षेत्र हे पुणे शहरापुरते न ठेवता पुणे जिल्हा व अहमदनगरमधील अकोले तालुक्यापर्यंत आपण कार्यरत आहोत. नेहमीच अग्रेसर ते कोणतेही सामाजिक कार्य असो अशी आपली संस्था शैक्षणिक क्षेत्रासाठी जास्त काम करु इच्छिते हे आपणास सोबतचे अहवालावरुन निदर्शनास येईल.

पाच तालुक्यांमध्ये शैक्षणिक काम करत असतांना आपले लक्षात येईल की हे कार्य करत असतांना विविध विषयाचे मार्गदर्शक, विविध ठिकाणची महाविद्यालये व त्या ठिकाणचे प्राचार्य, शिक्षकवृंद व सहकारी ह्यांचे सहकार्य लाभले.

विद्यार्थी व शिक्षक समोर ठेऊन जात असतांना आदिवासी भागातील कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य ह्यांना देखील मार्गदर्शनाची गरज आहे हे लक्षात येताच वनहक्क कायदा, पंचायत कायदा, जनमाहिती कायदा ह्या सारख्या गोष्टींची देखील दखल घेणे गरजेचे आहे हे पाहून त्यावर देखील कार्यशाळा आयोजित केल्या हे आपले लक्षात येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले ह्यांचे कार्याची दिशा डोळ्यासमोर ठेवून त्या अनुषंगाने आपण काय करु शकतो का ? ह्यावर विचार करुनच आम्ही एक एक नवीन कल्पना समाजासमोर नेण्याचा प्रयत्न करत आहोत. काही काही प्रसंगी तर न्यायालयाची मदत देखील घेत आहोत हे देखील आपणास माहीत आहे.

आम्हाला आशा आहे की आपणासर्वांचे सहकार्य व थोरा मोठ्यांचे आशिर्वाद बरोबर घेऊन जात आहोत त्यामुळे प्रयत्नांना यश तर निश्चितच येते. आपणासर्वांचे आभार मानणे उचित होणार नाही कारण आम्ही नेहमीच ऋणात राहु इच्छितो.

जय आदिवासी

संचालक व विश्वस्तांचे वतीने आपले नम्र

नामदेव गंभिरे
कार्याध्यक्ष

सीताराम जोशी
अध्यक्ष

# कार्यक्रमांचा अहवाल

## सन २०१२ - २०१३

### गुणवंत आदिवासी विद्यार्थी सत्कार व स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्कार

दि. २२ जुलै २०१२ रोजी संस्थेने मार्च २०१२ मध्ये इ. १० वी व इ. १२ वी उत्तीर्ण होऊन शे. ६०% पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे सभागृहात प्रा. डॉ. मनोहरराव जाधव ह्यांचे हस्ते व मार्गदर्शनाखाली पार पडला. सदर कार्यक्रमात कु. मयुरा नामदेव गंभिरे इ. १२ वी शास्त्र ८२.१७% व कु. निशा गुणवंत काटे इ. १० वी ९३.४५% गुण मिळवून उत्तीर्ण झालेबद्दल त्यांना स्व. प्रतापराव देशमुख स्मृतीपुरस्कार व रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

### उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार

सन २०१२ चा पुरस्कार दि. १२ ऑगस्ट २०१२ रोजी शासकिय आश्रमशाळा, कोहाणे, ता. अकोले, जि. अहमदनगर यांना डॉ. कानवडेसर, प्राचार्य ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर, ता. अकोले ह्यांचे हस्ते ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर येथे प्रदान करण्यात आला.

### इंग्रजी विषयाची कार्यशाळा

दि. १२ ऑगस्ट २०१२ रोजी ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर येथे इ. १० वी चे शिक्षकांसाठी इंग्रजी विषयांची कार्यशाळा घेण्यात आली. आदिवासी भागातील इ. १० वी चे इंग्रजी शिकविणारे ८० शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यशाळेस श्री. शैलेश बर्गे यांनी मार्गदर्शन केले.

### ग्रामपंचायत सदस्य कार्यशाळा

आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायत सदस्यांना ग्रामपंचायतीचे कारभाराविषयी माहिती व्हावी या उद्देशाने संस्थेने

| | | |
|---|---|---|
| दि. १९ ऑगस्ट २०१२ | - | शिनोली, ता. आंबेगाव |
| दि. २६ ऑगस्ट २०१२ | - | डेहणे, ता. खेड |
| दि. २ सप्टेंबर २०१२ | - | वडगाव मावळ, ता. मावळ |
| दि. ९ सप्टेंबर २०१२ | - | श्री छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, ता. जुन्नर |

असे कार्यक्रम घेतले. सदर कार्यक्रमात डॉ. मनोहर पांडकर व श्री. गजानन पंडीत ह्या तज्ञ व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले.

### गुणवंत शिक्षक पुरस्कार

पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील इ. १० वी चे वर्गाचा १००% निकाल लावणारे वर्गशिक्षकांचा स्व. तुकाराम शेळकंदे ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा हा पुरस्कार दि. ९ सप्टेंबर २०१२ रोजी श्री. भुजबळसर, शासकीय आश्रमशाळा, खिरेश्वर, ता. जुन्नर, जि. पुणे ह्यांना सौ. शेळकंद नगराध्यक्षा जुन्नर ह्यांचे हस्ते श्री छत्रपती महविद्यालय जुन्नर येथे वितरित करणेत आला.

### गुणवत्ता सुधार कार्यक्रम

दि. २२ जानेवारी २०१३ व ३ फेब्रुवारी २०१३ रोजी मावळ तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम वडेश्वर व मालेगाव खु।। येथे घेण्यात आला. सदर कार्यक्रमात इ. १० वी चे विद्यार्थ्यांना इंग्रजीसाठी श्री. शैलेश बर्गे व गणितासाठी श्री. दिनानाथ गोरे सर ह्यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात संवाद प्रकाशनचे 'संवाद दिवाळी' हे अंक श्री. मिलिंद पत्की व श्री. शंकरराव सुपे, मा. सभापती वडगाव मावळ, जि. पुणे ह्यांचे हस्ते वाटप करणेत आले.

### शैक्षणिक धोरण कार्यशाळा

शासनाचे शैक्षणिक धोरण व शिक्षकांची भुमिका ह्या विषयांवर दि. १७ मार्च २०१३ रोजी कार्यशाळा आरोग्य मंडळ, सभागृह डिंभे येथे आयोजित केली होती. आंबेगाव तालुक्यातल १४७ शिक्षकांनी सदर कार्यक्रमाचा लाभ घेतला. सदर कार्यशाळेस डॉ. प्रदिप आगाशे व श्री. ज्ञानेश पुरंदरे ह्यांनी मार्गदर्शन केले.

# कार्यक्रमांचा अहवाल

## सन २०१३ - २०१४

### मुख्याध्यापक कार्याशाळा

दि. २२ जून २०१३ रोजी बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे व्यवस्थापन या विषयावर आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील विद्यालयांचे मुख्याध्यापकांची कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेस श्री. चंद्रशेखर चितळे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजीत जाधवसर उपस्थित होते.

### गुणवंत आदिवासी विद्यार्थी सत्कार व स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्कार वितरण

दि. २१ जुलै २०१३ रोजी संस्थेने मार्च २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १० वी व इ. १२ वी मध्ये पुणे शहरातून ६०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेले व इ. १० वी मध्ये पुणे व नगर जिल्ह्यातील आदिवासी भागातील विद्यालयातील गुणानुक्रमे उत्तीर्ण तीन विद्यार्थ्यांचा सत्कार व स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्काराचे वितरण मा. डॉ. संजीव सोनवणे, अधिव्याख्याता, पुणे विद्यापीठ ह्यांचे हस्ते - कु. निकिता रघुनाथ भालचिम इ. १० वी ८८.४०% व कु. पुनम अशोक किरवे इ. १२ वी कला ७३.८५% ह्यांना रोख पुरस्कार व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

### गुणवंत शिक्षक पुरस्कार

सन २०१३ चा गणुवंत शिक्षक पुरस्कार श्री. ढोबळे सर, ज्ञानदा विद्यालय, गोद्रे ह्याना मा. डॉ. पुराणे पाटील, प्राचार्य श्री छत्रपती विद्यालय, जुन्नर व मान्यवरांचे उपस्थितीत दि. १० ऑगस्ट २०१३ रोजी वितरीत करणेत आला.

### प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी व गणित विषयांची कार्यशाळा

दि. १० ऑगस्ट २०१३ रोजी श्री छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथे जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी व गणित या विषयांसाठी कार्यशाळा आयोजित केली. सदर कार्यशाळेस इंग्रजी श्री. शैलेश बर्गे व गणितासाठी श्री. उल्हास पोहरे ह्यांनी मार्गदर्शन केले.

### उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार व इंग्रजी विषयांची कार्यशाळा

उत्कृष्ट आश्रमशाळा २०१३ चा पुरस्कार शासकिय आश्रमशाळा केळी-कोतुळ, ता. अकोले, जि. अहमदनगर ह्यांना मा. प्राचार्य अभिनव महाविद्यालय, अकोले, ता. अहमदनगर येथे महाविद्यालयाचे प्राचार्य व श्री. घोडेसर ह्यांचे हस्ते दि. १३ ऑगस्ट २०१३ रोजी वितरित करणेत आला. सदर कार्यक्रमास श्री. वाघचौरे, सहा. प्रकल्पाधिकारी राजूर, उपस्थित होते.

### इंग्रजी व गणित कार्यशाळा

संस्थेतर्फे पुणे व नगर जिल्ह्यातील इ. १० वी चे शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित विषयाचे कार्यशाळांचे आयोजन करणेत आले होते.

| दिनांक | स्थळ | तज्ञ मार्गदर्शक |
|---|---|---|
| १३ ऑगस्ट २०१३ | अभिनव महाविद्यालय, अकोले | श्री. शैलेश बर्गे - इंग्रजी |
| १७ ऑगस्ट २०१३ | शासकिय आश्रमशाळा, राजपूर | श्री. शैलेश बर्गे - इंग्रजी |
| १० ऑक्टोबर २०१३ | शासकिय आश्रमशाळा, गोऱ्हे बु।। | श्री. उल्हास पोहरे - गणित |
| | | श्री. शैलेश बर्गे - इंग्रजी |
| २४ ऑक्टोबर २०१३ | अनुदानित आश्रमशाळा, फुलवडे | श्री. शैलेश बर्गे - इंग्रजी |
| व २३ नोव्हेंबर २०१३ | | श्री. उल्हास पोहरे - गणित |
| २५ जानेवारी २०१४ | वाडा, ता. खेड, तळेघर, ता. आंबेगाव | श्री. शैलेश बर्गे - इंग्रजी |

## शिष्यवृत्ती परिक्षा इ. ७ वी कार्यशाळा

दि. २५ जानेवारी २०१४ रोजी इ, ७ वी चे विद्यार्थांसाठी शिष्यवृत्ती परिक्षांसाठी राजेवाडी, पोखरी, तेरुगंण, तळेघर व गाडेवाडी येथे कार्यशाळा घेण्यात आल्या. सदर कार्यशाळेस श्री. विकास पडेर ह्यांनी मार्गदर्शन केले.

## इ. १० वी चे विद्यार्थ्यांची कार्यशाळा

परीक्षेला जाता जाता म्हणून इंग्रजी, गणित व मराठीसाठी शासकिय आश्रमशाळा, शेंडी, मान्हेरे, घाटघर, वारंघुशी, पैठण, साकीरवाडी, पोहाणे, कोथळे येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व 'संवाद' अंकाचे वाटप दि. २८ जानेवारी २०१४ रोजी करणेत आले.

## माहिती अधिकार व पेसा कायदा

दि. १२ नोव्हेंबर २०१३ रोजी डिंभे येथे कार्यकर्त्यांसाठी माहितीच्या अधिकार व पेसा कायदा या विषयांवर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेस श्री. विठ्ठल बुलबुले व श्री. महादेव वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.

## गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम २०१३









# कार्यक्रमांचा अहवाल

## सन २०१४ - २०१५

### गुणवंत आदिवासी विद्यार्थी सत्कार व स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्कार

दि. १३ जुलै २०१४ रोजी सदरचा कार्यक्रम संस्थेचे सभागृहात प्रा. दत्तात्रय बाळसराफ, प्राचार्य, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव ह्यांचे मार्गदर्शन व हस्ते पार पाडणेत आला. सदर कार्यक्रमात - ऋषिकेश दिलीप पारधी इ. १० वी ९३.६४%, प्रशांत पांडूरंग भोकरे इ. १२ वी ८०.३३% ह्यांना स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्काराने गौरविणेत आले. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड ह्या दुर्गम आदिवासी भागातील ५ मुलींचे शैक्षणिक पालकत्त्व स्विकारले.

### उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार

सदरचा २०१४ चा पुरस्कार शासकिय आश्रमशाळा, शेंडी, ता. अकोले, जि. अहमदनगर ह्यांना दि. १७ ऑगस्ट २०१४ रोजी ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर येथे प्रा. डॉ. कानवडे सर व मान्यवरांचे उपस्थित वितरित करणेत आला.

### व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा

संस्थेतर्फे व्यक्तिमत्त्व विकासावर कार्यशाळा घेण्यात आल्या. सदरचे कार्यशाळेस मा. प्रा. अजित अडसुळे व मा. मिलिंद गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

| दिनांक | कार्यशाळेचे स्थळ |
|---|---|
| ७ जानेवारी २०१५ | डेहणे महाविद्यालय, डेहणे, ता. खेड, जि. पुणे<br>वाडा, ता. खेड, जि. पुणे<br>वसतिगृह - राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे |
| ८ जानेवारी २०१५ | बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, आंबेगाव<br>उच्चमाध्यमिक आश्रमशाळा, सोमतवाडी, जुन्नर<br>शासकीय मुलींचे वसतीगृह, ता. जुन्नर |
| २८ जानेवारी २०१५ | मुला / मुलींचे वसतीगृह, मंचर, आंबेगाव |
| २९ जानेवारी २०१५ | कला महाविद्यालय, राजूर, आश्रमशाळा, शेंडी, महाविद्यालय भंडारदरा, ता. अकोले |

### इ. १० वी इंग्रजी व गणित कार्यशाळा

संस्थेने इ. १० वी चे विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित कार्यशाळेचे आयोजन केले होते. सदर कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना 'संवाद' दिवाळी अंकाचे वाटप करणेत आले.

#### कार्यशाळांचा तपशिल


| दिनांक | स्थळ | मार्गदर्शक |
|---|---|---|
| १२ फेब्रुवारी २०१५ | शासकीय आश्रमशाळा, राजपूर | श्री. शैलेश बर्गेसर |
| | शासकीय आश्रमशाळा, तेरुंगण | श्री. दिलीप रावळे सर |
| | भिमाशंकर विद्यालय, तळेघर | श्री. बढेसर |
| १० फेब्रुवारी २०१५ | शासकिय आश्रमशाळा, गोऱ्हे बु।। | श्रीमती बिडकर |
| | अनुदानित आश्रमशाळा, फुलवडे | सौ. आशा माने |
| | शरद पवार विद्यालय, डिंभे | श्री. राजु गायकवाडसर |

याचबरोबर, आम्ही दि. १६ ऑगस्ट २०१४ रोजी शासकिय आश्रमशाळा, अकलापूर, ता. संगमनेर येथे भेट दिली असता त्यांनी काही सुचना केल्या व त्या अनुशंगाने 'मी सावित्रीबाई फुले बोलतेय' हा सौ. जयश्री तिटकारे ह्यांचा एकपात्री प्रयोग या शाळेवर केला.

तसेच माळीण दुर्घटना घडली असतांना सर्व कार्येकर्ते त्या ठिकाणी घटनेच्या दिवशी व त्यांनतरही वारंवार जाऊन भेट देऊन आलले आहेत.

## उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार वितरण - २०१३












## उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार वितरण - २०१२



## उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार वितरण - २०१४



# संस्थेतर्फे दिले जाणारे पुरस्कार

संस्थेतर्फे आदिवासी समाजात काम करणारे. व्यक्ति, विद्यार्थी, शिक्षक ह्याचेसाठी विविध पुरस्कार नियमित केलेले आहेत.

### आदिवासी भुषण पुरस्कार

आदिवासी समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकिय इ. क्षेत्रात कार्य करणाऱ्या आदिवासी व्यक्तिस हा पुरस्कार दिला जातो.

### गुणवंत शिक्षक पुरस्कार

पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षणाचे योगदान देत असलेले शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शिक्षकी पेशातून निवृत्त झालेले स्व. तुकाराम शेळकंदे गुरुजी, ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ श्री. रामचंद्र तुकाराम शेळकंदे ह्यांचेतर्फे हा पुरस्कार पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील शाळांमधून ज्या शाळेचा इ. १० वी निकाल १००% लागतो अश्या शाळेच्या इ. १० वी चे वर्गशिक्षकास रु. ५००१/- व स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ घेऊन गौरविण्यात येते.

### उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार

आश्रमशाळेत घेतलेले शिक्षण व त्याला वडीलांनी दिलेले पाठबळ व आशिर्वाद ह्याचा विचार करुन उच्चशिक्षित झालेले श्री. नामदेव गंभिरे ह्यांनी आपले वडीलांचे स्मृतिप्रित्यर्थ स्वर्गीय देवराम गंभिरे उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार २०१२ पासून सुरु केले आहे. ह्या पुरस्काराचे स्वरुप रु. ११०००/- रोख सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असा असतो. ज्या आश्रमाशाळेचा निकाल १००% लागतो. अश्या आश्रमशाळेस हा पुरस्कार देण्यात येतो.

### गणुवंत विद्यार्थी पुरस्कार

पुणे व नगर जिल्ह्यातील इ. १० वी चे आदिवासी विद्यार्थ्यांमधून गुणानुक्रमे उत्तिर्ण तीन विद्यार्थ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो, ह्यामध्ये रोख रु. ३०००/-, रु, २०००/- व रु. १०००/- स्मृतीचिन्ह तसेच इ. १२ वी मध्ये प्रत्येक शाखेत प्रथम आलेले विद्यार्थ्यास प्रत्येकी रु. ३०००/- व स्मृतीचिन्ह देऊन गौरविणेत येते. तसेच, पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्थेचे संयुक्त विद्यमाने शहरातील इ. १० वी व इ. १२ वी चे विद्यार्थ्यांना विविध विषयांची रोख पारितोषिके तसेच सन्मानाचा 'स्वर्गिय प्रतापराव देशमुख' स्मृतीपुरस्कार देऊन गौरविणेत येते.

# संस्थेची आगामी उद्दिष्ट्ये :-

१) सांगवी, पुणे येथील संस्था कार्यालयाचे विस्तारीत इमारतीचे बांधकाम करणे.
२) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी एकलव्य स्पर्धा परीक्षा केंद्र उभारणे.
३) कायम स्वरुपी नोकरी विषयक प्रशिक्षण केंद्र चालविणे.
४) महिला सक्षमीकरण प्रशिक्षण
५) आदिवासी नागरी सहकारी पतपेढीचे बँकेत रुपांतर करणे.

## आदिवासी समाज कृती समिती मार्फत आजपर्यंत राबविलेल्या उपक्रमांची यादी


१) आदिवासी समाजाचे जनजागृती मेळावे
२) खोट्या आदिवासींचा धोका पुस्तक प्रकाशन
३) आदिवासी समाजाच्या विविध योजना उपक्रम
४) खोट्या आदिवासींच्या तक्रारी व न्यायालयीन लढे
५) आदिवासी महिला प्रबोधन शिबीराचे आयोजन
६) माळेगाव तालुका मावळ जळीतग्रस्तांना मदत
७) कातकरी कुटूंबीयांचे सर्वेक्षण व रेशनकार्ड
८) कातकऱ्यांचे सामुदायिक विवाह
९) प्राथमिक शिक्षकांची इंग्रजी विषयांची कार्यशाळा
१०) माध्यमिक शिक्षकांची इंग्रजी विषयांची कार्यशाळा
११) १० वी इंग्रजी व गणित शिक्षकांचे प्रशिक्षण
१२) घोडेगाव प्रकल्प कार्यालयाचे स्थलांतराविरोधी आंदोलनात पुढाकार
१३) आदिवासी वधू - वर परिचय मेळाव्यांचे आयोजन
१४) १० वी व १२ वी विद्यार्थी सत्कार
१५) सांगवी, पुणे येथील संस्था कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम
१६) स्पर्धा परीक्षा वर्गांचे आयोजन
१७) वनाधिकार कायद्यावर चर्चासत्र
१८) नोकरी व शैक्षणिक संधींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
१९) १० वी इंग्रजी व गणित विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण
२०) उत्कृष्ठ आश्रमशाळा पुरस्कार
२१) उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार
२२) ग्रामपंचायत सदस्य कार्यशाळा
२३) गुणवत्ता सुधार कार्यक्रम
२४) शैक्षणिक धोरण कार्यशाळा
२५) १० वी / १२ वी विद्यार्थ्यांकरीता 'संवाद' या अंकाचे वितरण
२६) व्यवस्थापन या विषयावर मुख्याध्यापक कार्यशाळा
२७) आश्रमशाळेतील मुला-मुलींचे शारिरीक व मानसिक कौशल्य कार्यशाळा
२८) माहितीचा अधिकार व पेसा कायदा कार्यशाळा
२९) इ. ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा कार्यशाळा
३०) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथील अतिदुर्गम आदिवासी भागातील ५ मुलींचे शैक्षणिक पालकत्व
३१) 'मी सावित्रीबाई फुले बोलतेय' एकपात्री प्रयोग
३२) व्यक्तीमत्त्व विकास कार्यशाळा

## आदिवासी समाज कृती समिती मार्फत आजपर्यंत राबविलेल्या उपक्रमांची प्रशिक्षकांची यादी

| अ.क्र. | नाव | विषय |
|---|---|---|
| १. | श्री. शैलेश बर्गे | इंग्रजी |
| २. | श्री. मनोज पांडकर | पंचायतराज व ७३ वी घटनादुरुस्ती |
| ३. | श्री. गजानन पंडीत | पंचायतराज व ७३ वी घटनादुरुस्ती |
| ४. | श्री. दिनानाथ गोरे | गणित |
| ५. | डॉ. प्रदिप आगाशे | शैक्षणिक धोरण |
| ६. | मा. ज्ञानेश पुरंदरे | शैक्षणिक धोरण |
| ७. | मा. प्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज श्री. चंद्रशेखर चितळे | व्यवस्थापन |
| ८. | श्री. उल्हास पोहरे | गणित |
| ९. | डॉ. पद्माकर पंडीत व सौ. पंडीत | शारिरीक व मानसिक आरोग्य |
| १०. | श्री. विठ्ठल बुलबुले | माहितीचा अधिकार व पेसा कायदा |
| ११. | श्री. महादेव वाघमारे | माहितीचा अधिकार व पेसा कायदा |
| १२. | श्री. विकास पडेर | शिष्यवृत्ती परीक्षा |
| १३. | प्रा. श्री. मिलींद गायकवाड | व्यक्तीमत्त्व विकास |
| १४. | डॉ. अनिल अडसुळे | व्यक्तीमत्त्व विकास |
| १५. | प्रा. राजेंद्र गायकवाड | इंग्रजी |
| १६. | श्रीमती बीडकर | इंग्रजी |
| १७. | सौ. आशा माने | इंग्रजी |
| १८. | प्रा. बढेसर | इंग्रजी |
| १९. | प्रा. दिलीप रावळे | इंग्रजी |
| २०. | श्रीमती राजश्री तिटकारे | 'मी सावित्रीबाई फुले बोलतेय' एकपात्री प्रयोग |
| २१. | श्री. दुशिंगसर | इंग्रजी |

# आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

## अध्यापन शिक्षक कार्यशाळा, डिंभे २०१३











**श्री छत्रपती महाविद्यालय, जुन्नर**
**प्राथमिक शिक्षक कार्यशाळा - २०१३**




**ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय कार्यशाळेस**
**उपस्थित विद्यार्थी/विद्यार्थिनी व इतर**



## आस्थापन कार्यशाळा, घोडेगाव २०१४







## गुणवंत विद्यार्थी सत्कार २०१३



## गुणवंत विद्यार्थी सत्कार २०१४



## दत्तक मुली समवेत पत्रकार ज्ञानेश सावंत

